16 DEC 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा सोमवारी दीक्षांत समारंभ

## राज्यपाल रमेश बैस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या हीरकमहोत्सवी दीक्षांत समारंभ सोमवारी (दि. १८) सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे असणार आहेत. राज्यपाल रमेश बैस अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. दीक्षांत समारंभात ४९ हजार ४३८ पदव्या प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार



परिषदेत दिली.

दीक्षांत समारंभात ९ हजार ६०५ विद्यार्थी उपस्थित राहून पदवी घेणार आहेत. ३९ हजार ८३३ विद्यार्थ्यांना पोस्टाने पदवी प्रमाणपत्र पाठवली जाणार आहेत. यावर्षी पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या लक्षणीय आहे. विद्यार्थ्यांच्या तुलनेत पदवी घेणाऱ्या विद्यार्थिनींची टक्केवारी ५५.७८ इतकी आहे. समारंभात ४६ पीएच.डी. स्नातकांसह १६ जणांना व्यासपीठावर पारितोषिके व पदवी प्रमाणपत्रांचे वाटप केले जाणार आहे.

### साईसीमरन यांना राष्ट्रपतींचे सुवर्णपदक; बिल्कीस गवंडी यांना कुलपती सुवर्णपदक

शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. (मास.कॉम.) अधिविभागाची विद्यार्थिनी साईसीमरन हिदायत घाशी (मूळ गाव बत्तीस शिराळा, जि. सांगली) हिला २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक, तर जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूरची विद्यार्थिनी बिल्कीस हिदायत गवंडी (मु. पो. आगर, ता. शिरोळ) हिला कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले आहे. दीक्षांत समारंभात त्यांना ही पदके प्रदान करण्यात येतील.

### कुलगुरूंच्या उपस्थितीत ग्रंथदिंडी

दीक्षांत समारंभानिमित्त सलग १७ व्या वर्षी ग्रंथ महोत्सवाचे १६ ते १८ डिसेंबरदरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने नामवंत कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथ, उपाहारगृह आदींचे ४० स्टॉल्स असणार आहेत.

शनिवारी (दि. १६) सकाळी ७.३० ते ९.३० ग्रंथदिंडीला पालखी मिरवणुकीने (कमला कॉलेज) सुरुवात होईल. सकाळी ७.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन होणार आहे. सकाळी १० वाजता ग्रंथमहोत्सव स्टॉल उद्घाटन कुलगुरूंच्या हस्ते राजमाता जिजाऊसाहेब सभागृहाजवळ होईल. दि. १७ रोजी सकाळी ११ स्वरांग हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. पत्रकार परिषदेस कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.

### प्रमुख पाहुणे डॉ. एस. एस. मंथा



डॉ. एस. एस. मंथा ४० वर्षे शैक्षणिक व प्रशासकीय सेवेत कार्यरत आहेत. एआयसीटीईचे चेअरमन असताना त्यांनी ई-गव्हर्नन्सचा वापर संस्थांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केला. रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स विषयावर त्यांचे काम आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे २८० शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. एसएनडीटी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. सध्या ते महाराष्ट्र शासनाच्या महाप्रित स्टार्टअप नॉलेज सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.

### दीक्षांत समारंभात वाटप करण्यात येणाऱ्या पदव्या

| | |
|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान शाखा | २१ हजार ४०५ |
| वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखा | १३ हजार ८६० |
| मानव्यशास्त्र विद्याशाखा | ११ हजार ३०१ |
| आंतरविद्याशाखीय अभ्यास | २ हजार ८७१ |

16 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साईसिमरनला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक

## विद्यापीठाचा सोमवारी दीक्षांत समारंभ : बिल्कीस गवंडीला कुलपती सुवर्णपदक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६०वा दीक्षान्त समारंभ येत्या सोमवारी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सकाळी ११.३० वाजता. होणार आहे. विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. या समारंभात विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाची विद्यार्थिनी साईसिमरन हिदायत घाशी हिला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर जयसिंगपूर कॉलेजची विद्यार्थिनी बिल्कीस हिदायत गवंडी (मूळ गाव : आगर. ता. शिरोळ ) हिला एम. ए.च्या हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल कुलपती सुवर्णपदक जाहीर केले. यंदा ४१ हजार ४३८ विद्यार्थ्यांना पदवी देण्यात येणार आहे. यात सर्वाधिक वाटा मुलींचा आहे. २७ हजार ४७५ मुली पदवी घेणार आहेत. या पत्रकार परिषदेला कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.



बिल्कीस गवंडी



### ९० मिनिटे राज्यपाल विद्यापीठ प्रांगणात

दीक्षान्त समारंभात राज्यपालांच्या हस्ते एक राष्ट्रपती सुवर्णपदक, कुलपती सुवर्णपदकासह १६ स्नातकांना व पीएच.डी. प्राप्त ४६ स्नातकांना पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. सकाळी ११:३० ते दुपारी १ वाजेपर्यंत दीक्षान्त समारंभ सुरू राहणार आहे. विद्यापीठाच्या प्रांगणात १६०५ स्नातकांना पदवी प्रमाणपत्र देण्यात येईल, तर ३९ हजार ८३३ जणांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र दिले जाईल.

### उपस्थितीत राहून पदवी घेणारे

विद्यार्थी : ३९२६, विद्यार्थिनी : ५६७१

अनुपस्थित राहून पदवी घेण्यासाठी नोंद केलेले

विद्यार्थी : १८०३७, विद्यार्थिनी : २१७९६

**पदवी घेणारे विद्यार्थी शाखानिहाय**

- सायन्स अँड टेक्नॉलॉजी - २१४०५
- कॉमर्स अँड मॅनेजमेंट-१३८६०
- मानव्यविद्या-११३०१
- आंतरविद्याशाखीय-२८७१

### आज ग्रंथदिंडी

दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर तीन दिवस ग्रंथमहोत्सवाचे आयोजन केले आहे. आज शनिवारी सकाळी ७:३० वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. यंदाच्या महोत्सवात पुस्तक प्रकाशनासहित ५० स्टॉल असणार आहेत. यामध्ये शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांवर १० टक्के सवलत देण्यात येणार आहे.

### आईचे प्रोत्साहन हेच बळ



साईसिमरन

साईसिमरन घाशी ही मूळची (बत्तीस शिराळा, जि. सांगली) येथील रहिवासी आहे. विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात दुसऱ्या वर्षात ती शिकते. इंग्रजी विषयातून बी.ए.ची पदवी घेतलेल्या साईसिमरनला आईने घडविले. मुलीला शिकवून काय करणार, असे समाजाचे टोमणे आईला खावे लागले. पण, आई खचली नाही. तिने शिकवले. प्रोत्साहन दिल्यानेच इथेपर्यंतचा प्रवास झाल्याचे तिने सांगितले. सरकारच्या जनसंपर्क क्षेत्रात नोकरी करण्याचे ध्येय असल्याचे ती म्हणाली.

### वेळेआधी निकाल लावल्याने पदव्या लवकर हातात

पूर्वी दीक्षान्त समारंभ हा उशिराने होत होता. मात्र, विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने सरासरी ३० दिवसांत निकाल घोषित करण्याचा प्रयत्न चालविला. त्याला यशही आले. यंदा तर सरासरी १५ दिवसांत ६८० परीक्षांचे निकाल घोषित केले आहेत. त्यामुळे दीक्षान्त समारंभ वेळेत होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रही लवकर मिळत असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 DEC 2023
पुढारी

# जनसंपर्क अधिकारी होऊन आईचे स्वप्न पूर्ण करणार

## राष्ट्रपती सुवर्णपदक विजेती साईसिमरनचा निर्धार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



दहावीत प्रथम आल्यावरदेखील कुटुंबातील लोकांनी मुलीला कशाला शिकवतेस, असे नातेवाईक व लोकांकडून आईला सांगितले जात होते. मात्र, आई पाठीशी खंबीर राहिल्याने शिवाजी विद्यापीठाचे यावर्षीचे राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळवू शकले. शासकीय जनसंपर्क अधिकारी होऊन आईचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार साईसिमरन वाशीने केला आहे.

साईसिमरन बत्तीस शिराळा (जि. सांगली) येथील आहे. घरची परिस्थती बेताची. आठवीत असताना वडिलांचे निधन झाले. दोन भाऊ व माझा आईने सांभाळ केला. शालेय शिक्षण गावातच झाले. न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, पेठ येथे बारावी तर केआरपी कॉलेजमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण झाले. कुटुंबीयांचा विरोध झुगारून आईने काबाडकष्ट करून शिकवले. पदवीचे शिक्षण घेताना व्हाईस ओव्हर आर्टिस्ट म्हणून काम केले. सध्या विद्यापीठात मास कम्युनिकेशन विभागात शिकत आहे. पदक मिळाल्याचा आनंद आहे.

# शेतकऱ्याची मुलगी कुलपती सुवर्णपदकाची मानकरी

## आगरच्या बिल्कीसचे प्राध्यापक होण्याचे स्वप्न

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाचे यावर्षीचे कुलपतींचे सुवर्णपदक आगर, ता. शिरोळ येथील शेतकऱ्याची मुलगी बिल्कीस गवंडीने पटकाविले आहे. प्राध्यापक होऊन विद्यार्थी घडविण्याचे काम करणार असल्याची भावना तिने व्यक्त केली.

बिल्कीसचे वडील शिरोळ तालुक्यातील शेतकरी असून आई गृहिणी आहे. शालेय शिक्षण गावात झाल्यावर पदवीपर्यंतचे शिक्षण गंगाबाई घोडावत कन्या महाविद्यालयातून पूर्ण केले. एमएचे शिक्षण जयसिंगपूर कॉलेजमध्ये घेतले. मध्यमवर्गीय कुटुंब असल्याने इलेक्ट्रॉनिक्सच्या शोरूममध्ये 'सीएसआर' म्हणून काम करीत शिक्षण घेतले. कलाशाखेत एमएला प्रथम क्रमांक मिळवला.

यावर्षीचे कुलपतींचे सुवर्णपदक मिळाल्याचा आनंद आहे. त्याचबरोबर मारुलकर स्मृती पुरस्कार, डॉ. चंदुलाल दुबे यासह पाच पुरस्कार मिळाले आहेत. नेट-सेट करून प्राध्यापक होणार असल्याचे बिल्कीसने सांगितले.

जनसंपर्क कक्ष

16 DEC 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ सोमवारी

## साईसिमरन यांना राष्ट्रपतींचे, तर बिल्कीस गवंडी यांना कुलपती सुवर्णपदक





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. (मास. कॉम.) अधिविभागाची विद्यार्थिनी साईसिमरन हिदायत घाशी (मूळ गाव बत्तीसशिराळा) हिला २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक, तर जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूरची विद्यार्थिनी बिल्कीस हिदायत गवंडी (मु. पो. आगर, ता. शिरोळ) हिला कुलपती सुवर्णपदक जाहीर करण्यात आले आहे. सोमवारी (दि. १८) होत असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ६०व्या दीक्षान्त समारंभात त्यांना ही पदके प्रदान करण्यात येतील, अशी माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या ६०व्या दीक्षान्त समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा उपस्थित राहणार आहेत. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती डॉ. रमेश बैस उपस्थित राहणार आहेत. या दीक्षान्त समारंभात ४९ हजार ४३८ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत. यामध्ये मुलींची संख्या २७ हजार ४७५ इतकी लक्षणीय आहे. एकूण स्नातकांपैकी ९ हजार ६०५जण प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत, तर ३९ हजार ८३३ जण पोस्टाव्दारे पदवी स्वीकारणार आहेत.

दीक्षान्त समारंभाचे औचित्य साधून 'ग्रंथ महोत्सव-डिसेंबर २०२३'चे आयोजन १६ ते १८ डिसेंबरदरम्यान केले आहे. ग्रंथ महोत्सवाचे हे १७ वे वर्ष आहे. महोत्सवामध्ये शनिवारी सकाळी ग्रंथदिंडीचे उद्घाटन कमला कॉलेज येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. तर रविवारी सकाळी ११ वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे 'स्वररंग' सांस्कृतिक हा कार्यक्रम राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सादर केला जाईल. ग्रंथ महोत्सवातील स्टॉल १६ ते १८ डिसेंबरदरम्यान सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत सुरू असणार आहेत. दरम्यान सोमवारी होणारी परीक्षा स्थगित करण्यात आली आहे. तर दीक्षान्त सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील सर्व अधिविभाग रविवारी सुरू राहणार आहेत.

या वेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.

16 DEC 2023 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साईसिमरनला राष्ट्रपती तर बिल्किस गवंडीला कुलपती सुवर्णपदक

## शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात सोमवारी वितरण : कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांची माहिती

प्रतिनिधी
कोल्हापूर


शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. (मास. कॉम.) अधिविभागाची विद्यार्थिनी साईसिमरन हिदायत घाशी (मूळ गाव बत्तीस शिराळा) हिला यंदाच्या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रपती सुवर्णपदकाचा बहुमान मिळाला. जयसिंगपूर येथील जयसिंगपूर कॉलेज, विद्यार्थिनी बिल्कीस हिदायत गवंडी (मु.पो. आगर, ता. शिरोळ) यास कुलपती सुवर्णपदकाचा बहुमान जाहीर करण्यात आला आहे.



साईसिमरन घाशी



बिल्कीस गवंडी



सोमवार दि. १८ रोजी होणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभात त्यांना ही पदके प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.

साईसिमरनने शैक्षणिक वर्षामध्ये क्रीडा, बौध्दिक व कला क्षेत्र व एन.सी. सी., एन.एस.एस. यामधील गुणवत्ता तसेच व्यक्तिमत्व, शारिरीक आरोग्य, भाषा शुध्दता, सर्वसाधारण ज्ञान, वागणूक व नेतृत्व गुण यामध्ये आदर्श ठरल्याबद्दल 'राष्ट्रपती सुवर्णपदक' प्रदान करण्यात येत आहे. बिल्कीसने मार्च २०२३ मध्ये एम.ए परीक्षेतील सर्व भाषांमधून 'हिंदी' विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल 'कुलपती सुवर्णपदक' प्रदान करण्यात येत असल्याचे कुलगुरू शिर्के यांनी सांगितले.

### साईसिमरनचा अल्प परिचय

साईसिमरनने बी. ए. च्या सामान्य गुणवत्ता यादीत चौथा क्रमांक मिळवला. 'भारतातील २१ व्या शतकात सामाजिक-सांस्कृतिक मानकांच्या आकारात साहित्याची भूमिका' या शीर्षकाचा शोधनिबंध त्यांनी प्रकाशित केला. पहिल्या आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सव आणि परिषदेत '१९ व्या शतकातील विस्थापनाचे साहित्य' नावाचा शोधनिबंध प्रकाशित केला. रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड एज्युकेशन सोसायटी पुणे कॉलेज, कासेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय काव्य संमेलनात '१९ व्या शतकातील कविता: प्रतिबिंबित करणारी, आव्हानात्मक आणि सामाजिक-सांस्कृतिक नियमांना आकार देणे' या शीर्षकाचा शोधनिबंध त्यांनी प्रकाशित केला. 'भारतातील २१ व्या शतकातील सामाजिक सांस्कृतिक नियमांना आकार देण्यामध्ये साहित्याची भूमिका' या शीर्षकाचा शोधनिबंध व इचलकरंजी येथे इंग्रजी, हिंदी आणि मराठी साहित्यात २१ व्या शतकातील सामाजिक-सांस्कृतिक संदर्भावर एक दिवसीय राष्ट्रीय बहुभाषिक परिसंवाद सादर केला. त्यांची १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेत सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय युवा संसदपटू म्हणून निवड झाली आहे. याबद्दल त्यांचा नवी दिल्ली येथे सत्कार केला जाणार आहे.

16 DEC 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घाशी, गवंडी यांना सुवर्णपदक

## दीक्षान्त सोहळा सोमवारी; राज्यपालांसह डॉ. मंथा यांची उपस्थिती

▶ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षान्त सोहळा केंद्रीय पद्धतीने सोमवारी (ता. १८) सकाळी साडेअकरा वाजता राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे.

त्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे आहेत. यावर्षी सर्वसाधारण कौशल्यासाठीच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाची मानकरी बत्तीस शिराळा (जि. सांगली) येथील साईसिमरन हिदायत घाशी, तर हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबदलचे कुलपती सुवर्णपदक मौजे आगर (जि. कोल्हापूर) मधील बिल्कीस हिदायत गवंडी हिने पटकविले

पान १३ वर >



साईसिमरन घाशी



बिल्कीस गवंडी

**स्नातकांची संख्या**

| विद्याशाखा | मुले | मुली |
|---|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | १०९११ | १०४९५ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ५०७१ | ८७८९ |
| मानव्यशास्त्र | ४१९६ | ६३०५ |
| आंतरविद्याशाखीय | ९८५ | १८८६ |
| एकूण | २११६३ | २७४७५ |

'बिल्कीस'चे स्वप्न साकारण्याकडे पाऊल

'सिमरन'च्या यशाला आईच्या कष्टाचे कोंदण

वृत्त पान ५ वर.. >

16 DEC 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घाशी, गवंडी यांना 'सुवर्णपदक'

> पान १ वरून

असल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठातील एम. ए. मास कम्युनिकेशनची विद्यार्थिनी साईसिमरन आणि जयसिंगपूर कॉलेजची विद्यार्थिनी बिल्कीस यांना दीक्षान्त सोहळ्यात सुवर्णपदक प्रदान केले जाणार आहे. यावर्षी पदवी प्राप्त स्नातकांमध्ये विद्यार्थिनींची संख्या अधिक आहे. त्यांची टक्केवारी ५५.७८ इतकी, तर विद्यार्थ्यांची टक्केवारी ४४.२३ इतकी आहे. दीक्षान्त सोहळा आणि ग्रंथमहोत्सवाला विद्यार्थी, नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन डॉ. शिर्के यांनी केले. दीक्षान्त सोहळा ९० मिनिटांचा असून त्यात दोन सुवर्णपदक, १६ स्नातकांना पारितोषिके प्रदान केली जातील. विद्यापीठ प्रांगणात ९६०५, पोस्टाद्वारे ३९८३३ पदवी प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे. त्याची सर्व तयारी पूर्ण झाल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, ग्रंथमहोत्सवाचे समन्वयक डॉ. डी. बी. सुतार, मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

### कमी दिवसांत निकाल वेळेत

### दीक्षान्त समारंभ

मूल्यमापन वेळापत्रकाचे परीक्षा मंडळाने काटेकोरपणे पालन केल्याने यंदा ६८० परीक्षांचे निकाल ३० दिवसांच्या आत जाहीर झाले. त्यात निकाल जाहीर करण्याचे सरासरी दिवस १४ आहेत. मागील दोन वर्ष दीक्षान्त सोहळा जानेवारी, मार्चमध्ये घ्यावा लागला होता; पण, यावर्षी कमी दिवसांत आणि वेळेत निकाल लागल्याने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात हीरक महोत्सवी दीक्षान्त सोहळा होत असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. या सोहळ्यासाठी यंदा नोंदणी केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज केवळ ऑनलाईन स्वीकारले आहेत. त्यासाठीची प्रणाली विद्यापीठाच्या संगणक केंद्र, परीक्षा मंडळाने विकसित केली असल्याचे त्यांनी सांगितले.

### ग्रंथदिंडी आज

दीक्षान्त सोहळ्यानिमित्त आयोजित ग्रंथदिंडी व पालखी मिरवणूक उद्या (ता. १६) सकाळी साडेसात वाजता कमला कॉलेजपासून सुरू होईल. त्यानंतर तीनदिवसीय ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होईल. महोत्सवात पुस्तके, डेटाबेस पॅकेज आदींचे ५० स्टॉल आहेत. सकाळी ९ ते रात्री ९ अशी महोत्सवाची वेळ असल्याचे डॉ. सुतार यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 DEC 2023
सकाळ

# वडिलांचे स्वप्न साकारण्याकडे बिल्कीसचे एक पाऊल

कोल्हापूर, ता. १५ : 'माझ्या मुली या मुलांपेक्षा कमी नाहीत', अशा शब्दांत कौतुक करत वडिलांनी शिक्षणासाठी पाठबळ दिले. शिक्षण क्षेत्रात मी करिअर करावे असे त्यांचे स्वप्न होते. त्यांचे छत्र गेल्या चार महिन्यांपूर्वी हरपले आहे. मात्र, त्यांनी पाहिलेले स्वप्न साकारण्याकडे आई मेहजबीन, भाऊ हजरत, बहीण सानिया यांच्या पाठबळावर मी दमदारपणे वाटचाल करीत आहे. हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दलचे शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सुवर्णपदक हे त्यातील एक पाऊल असून ते माझे प्रोत्साहन वाढविणारे असल्याचे शिरोळ तालुक्यातील मौजे आगर येथील बिल्कीस हिदायत गवंडी हिने सांगितले.

शेतकरी कुटुंबातील बिल्कीस हिने जयसिंगपूर येथील श्रीमती गंगाबाई घोडावत कन्या महाविद्यालयातून पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे तिने एम. ए. अभ्यासक्रमासाठी जयसिंगपूर कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. अभ्यासातील सातत्याच्या जोरावर एम. ए. परीक्षेमधील सर्व भाषांमधून हिंदी विषयात सर्वाधिक ८९.२५ टक्के गुणांची कमाई करत शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सुवर्णपदक पटकविले आहे. या पदकासह उमा सदाशिवशास्त्री मारुळकर स्मृती पुरस्कार, डॉ. चंदूलाल दुबे पुरस्कार, डॉ. आर. व्ही. चिटणीस हिंदी पारितोषिक, महाकवी भूषण अकादमी आणि गुरुवर्य कल्लाप्पा घाटे गुरुजी पारितोषिक, शिष्यवृत्तीची ती मानकरी ठरली आहे. वक्तृत्व, शेरोशायरीची तिला आवड आहे. तिला जयसिंगपूर कॉलेजचे प्राचार्य डॉ. सूरत मांजरे, हिंदी विभागप्रमुख डॉ. सुनील बनसोडे आदींचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सुवर्णपदक जाहीर झाल्यानंतर बिल्कीस गवंडी हिचे पुष्पगुच्छ देऊन आई मेहजबिन यांनी अभिनंदन केले.

> 'कुलपती सुवर्णपदक मिळाल्याचा आनंद आहे. सहाय्यक प्राध्यापक होवून मला वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. त्यासाठी मी सेट-नेट, पीएचडी करणार आहे. त्याची तयारी सुरू केली आहे.
>
> **-बिल्कीस गवंडी**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 DEC 2023
सकाळ

# ‘सिमरन’च्या यशाला आईच्या कष्टाचे कोंदण

कोल्हापूर, ता. १५ : मध्यमवर्गीय कुटुंबातील सिमरन ही आठवीत असताना तिच्या वडिलांचे निधन झाले. पुढे शालेय जीवनातील महत्त्वाचा टप्पा असलेल्या दहावीचे शिक्षण घेताना 'काय करतेस मुलीला शिकवून तिचे लग्न करून टाक', असा सल्ला काहीजणांनी तिच्या आई शेहनाज यांना दिला. पण, त्याकडे दुर्लक्ष करत त्यांनी सिमरन हिला शिक्षणासाठी पाठबळ दिले. गारमेंटचे काम करत त्यांनी तिच्या शिक्षणाचा खर्च केला. त्यांच्या कष्टाचे कोंदण आज सिमरन हिने राष्ट्रपती सुवर्णपदकाच्या माध्यमातून मिळविलेल्या यशाला लाभले आहे.

सांगली जिल्ह्यातील बत्तीस शिराळा या गावातील सिमरन हिने इस्लामपूरमधील केआरपी महाविद्यालयातून बी. ए. (इंग्लिश) पदवीचे शिक्षण पूर्ण केले. लोकांशी संवाद साधण्याची तिला आवड असल्याने तिने जनसंपर्क क्षेत्रात करिअर करण्याचे ठरवून शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. जिद्दीने अभ्यास करत तिने क्रीडा, बौद्धिक, कला क्षेत्र, एनसीसी, एनएसएस यामधील गुणवत्ता तसेच व्यक्तिमत्त्व, शारीरिक आरोग्य, भाषा शुद्धता, आदींमध्ये आदर्श ठरल्याबद्दलचे राष्ट्रपती सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. शासकीय विभागात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करण्याचे तिचे ध्येय आहे. तिला कुटुंबीयासह मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : आई शेहनाज यांच्या पाठबळावर सिमरन घाशी हिने राष्ट्रपती सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे.

> 'राष्ट्रपती सुवर्णपदक मला जाहीर झाल्याचा खूप आनंद होत आहे. आईने मला कबाडकष्ट करून शिक्षण दिले असून हे पदक मिळणे माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. आई माझ्या पाठीशी राहिली आणि तिच्यामुळेच आज या सुवर्णपदकापर्यंत पोहोचले आहे. माझ्या यशात आई, भाऊ साहील, मालिक यांचा मोठा वाटा आहे.
>
> **- सिमरन घाशी**

16 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पृथ्वीच कधीतरी आपल्याला नष्ट करेल

## अतुल देऊळगावकर यांचे मत : व्ही. एन. शिंदे वसुंधरा पुरस्काराने सन्मानित




शिवाजी विद्यापीठ व किर्लोस्कर उद्योग समूह आयोजित किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात शुक्रवारी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना वसुंधरा सन्मान तर सुहास वायंगणकर, व्ही. टी. पाटील फाउंडेशन, मजले येथील जलमित्र फाउंडेशन व गार्डन्स क्लब यांना वसुंधरा मित्र पुरस्काराने सन्मानित केले. यावेळी सी. जी. रानडे, धीरज जाधव, वीरेंद्र चित्राव, अतुल देऊळगावकर, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. आसावरी जाधव व डॉ. रसिया पडळकर उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : निसर्ग प्रणाली बिघडली आहे. आपण पृथ्वीला संपवण्याआधी पृथ्वीच आपल्याला नष्ट करेल अशी वेळ आली आहे. विविध शास्त्रज्ञांनी शास्त्रीय अभ्यासातून हे दाहक चित्र स्पष्ट करूनही राजकीय नेते, लोकांना, कॉर्पोरेट कंपन्यांना ते कसे कळत नाही? असा सवाल पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांनी शुक्रवारी उपस्थित केला.

शिवाजी विद्यापीठ व किर्लोस्कर उद्योग समूह यांच्यातर्फे आयोजित किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना वसुंधरा सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रमोद पाटील होते. यावेळी देऊळगावकर यांनी सद्य पर्यावरणीय परिस्थितीची विस्तृत मांडणी केली. युरोपातील अनेक देशांमध्ये कलेच्या माध्यमातून पर्यावरणीय संकट मांडले जाते आणि ते अधिक प्रभावीपणे नव्या पिढीला भावते परंतु आपल्याकडे मात्र याकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. यावेळी डॉ.पी. एस. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी सी. जी. रानडे, धीरज जाधव, वीरेंद्र चित्राव, पर्यावरणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव उपस्थित होत्या. डॉ. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचालन केले. शरद आजगेकर यांनी आभार मानले.

**वसुंधरा मित्र पुरस्काराचे मानकरी**

- सुहास वायंगणकर,
- व्ही. टी. पाटील फाउंडेशन
- जलमित्र फाउंडेशन, मजले
- गार्डन्स क्लब

16 DEC 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवाची सांगता

## विविध पुरस्कारांचे शानदार सोहळ्यात वितरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ व किर्लोस्कर उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची सांगता तिसऱ्या दिवशी झाली. यावेळी अतुल देऊळगावकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.



किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या सांगता समारंभात विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

यामध्ये विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना विद्यापीठ परिसर जलयुक्त करण्यासाठी, तसेच त्यांच्या विज्ञान शिक्षणाच्या प्रचार-प्रसार कामासाठी वसुंधरा सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर सुहास वायंगणकर, व्ही. टी. पाटील फाऊंडेशन जलमित्र फाऊंडेशन, मजलेव गार्डन्स हे क्लब वसुंधरा मित्र पुरस्काराचे मानकरी होते.

याप्रसंगी अतुल देऊळगावकर यांनी सद्य पर्यावरणीय परिस्थितीचे अत्यंत विस्तृत अशी मांडणी केली. जागतिक संदर्भ आणि जागतिक विचारवंतांच्या नजरेतून हवामान बदल आणि पर्यावरणाचा विचार कोणकोणत्या माध्यमातून प्रकट होत आहे, हे त्यांनी उदाहरणासह दाखवले. कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी पुरस्कारास उत्तर देताना म्हणाले, जलसंधारणाच्या कामासाठी मिळालेला पुरस्कार हा माझा एकट्याचा नाही. हा पुरस्कार विद्यापीठाने एकत्रित बघितलेल्या स्वप्नाला मिळालेला आहे. याप्रसंगी फोटोग्राफी स्पर्धेचेही बक्षीस वितरण झाले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, वसुंधरा वाचली तरच आपले सर्वांचे अस्तित्व टिकणार आहे. त्यासाठी आज आणि आत्ताच प्रत्येकाला जागे होऊन कृतिशील होणे गरजेचे आहे. समारोप प्रसंगी, किर्लोस्कर समूहाचे सी. जी. रानडे, धीरज जाधव, वीरेंद्र चित्राव, पर्यावरणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव उपस्थित होत्या. सूत्रसंचलन डॉ. रसिया पडळकर यांनी व आभार शरद आजगेकर यांनी मानले.

16 DEC 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरणीय संकटाकडे गांभीर्याने पाहिले जात नाही

## अतुल देऊळगावकर; किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाची सांगता

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

युरोपातील अनेक देशांमध्ये कलेच्या माध्यमातून पर्यावरणीय संकट मांडले जाते व ते प्रभावीपणे नव्या पिढीला भावते. परंतु, आपल्याकडे मात्र गांभीर्याने पाहिले जात नाही. पृथ्वीला संपवण्याआधी पृथ्वीच आपल्याला नष्ट करेल, अशी वेळ आली आहे. हे राजकारणी, नागरिक व कॉर्पोरेट कंपन्याना कसे कळत नाही, अशी खंत पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगाकर यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठ व किर्लोस्कर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव सांगताप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू पी. एस. पाटील होते. देऊळगावकर यांनी जागतिक संदर्भ व जागतिक विचारवंतांच्या नजरेतून हवामान बदल, पर्यावरणाचा विचार कोणकोणत्या माध्यमातून प्रकट होतो हे उदाहरणासहित सांगितले. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी पुरस्कारास उत्तर देताना जलसंधारणाच्या कामासाठी मिळालेला पुरस्कार हा एकट्याचा नसून विद्यापीठाने एकत्रित बघितलेल्या स्वप्नाला मिळाला आहे, असे सांगितले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना वसुंधरा सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वसुंधरा मित्र पुरस्काराचे सुहास वायंगणकर, व्ही. टी. पाटील फाऊंडेशन, जलमित्र फाऊंडेशन, मजले व गार्डन्स क्लब मानकरी ठरले. यावेळी किर्लोस्कर समूहाचे सी. जी. रानडे, धीरज जाधव, वीरेंद्र चित्राव, पर्यावरणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव उपस्थित होत्या. सूत्रसंचालन डॉ. रसिया पडळकर यांनी केले. शरद आजगेकर यांनी आभार मानले.

16 DEC 2023

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरकरांनी नोंदवली उल्कांची निरीक्षणे

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** उल्कापात होत असताना साधारण तासाला ५० ते ६० उल्का पडतानाचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. हा उल्कावर्षाव साध्या डोळ्यांनी पाहण्याचा आनंद कोल्हापूरकरांनी मध्यरात्री घेतला.

मिथून राशीतून होणारा उल्कापात म्हणजे हौशी खगोलप्रेमींना एक पर्वणीच असते दर वर्षी. या वर्षी उल्कापात १४ आणि १५ रोजीच्या रात्री सर्वांत जास्त पाहायला मिळत असल्याने ही सुवर्णसंधी साधत नागरिक, विद्यार्थी हे अवकाश संशोधन केंद्र, पन्हाळा येथे जमले होते. मध्यरात्री एक ते दोनच्या सुमारास साधारणतः १०० ते १२० एवढ्या उल्का आपल्याला दिसतील अशी शक्यता वर्तवली असल्याने कडाक्याच्या थंडीमध्येही विद्यार्थी उत्साहाने निरीक्षण करत होते.



पदार्थविज्ञान विभागाच्या सनी गुरव नामक विद्यार्थ्यानेआकाशगंगा आणि उल्का यांचे छायाचित्र टिपले आहे.

साधारण तासाला ५० ते ६० उल्का पडतानाचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. हा उल्कावर्षाव साध्या डोळ्यांनी पाहण्याचा आनंद सर्वांनी घेतला. रात्री आठ वाजून ३० मिनिटांपासून ते पहाटे ५.३० पर्यंत मिथून राशीतून होणारा उल्कावर्षाव २० डिसेंबरपर्यंत पाहता येईल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी शुक्रवारी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 DEC 2023
पुढारी



# उल्का वर्षाव पाहण्याची खगोलप्रेमींना पर्वणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मिथुन राशीतून होणारा उल्का वर्षाव शुक्रवारी रात्री सर्वात जास्त पाहायला मिळाला. खगोलप्रेमींसाठी उल्का वर्षाव पाहणे ही पर्वणीच ठरली.

शिवाजी विद्यापीठाने अवकाश संशोधन केंद्र, पन्हाळा येथे विद्यार्थी, नागरिक यांच्यासाठी अवकाश निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मध्यरात्री १ ते २ या सुमारास साधारणत: १०० ते १२० एवढ्या उल्का दिसल्या. दर तासाला ५० ते ६० उल्का पडतानाचे निरीक्षण नोंदवण्यात आले, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 DEC 2023
लोकमत

# कला महोत्सव आज

कोल्हापूर : ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग, चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवनाच्या सभागृहात आज, शनिवारी सकाळी ८ वाजल्यापासून दिवसभर यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दीपक मिरजे, डॉ. संदीप इंचनाळकर, डॉ. पी. जी. कुलकर्णी, संदीप जाधव यांच्या उपस्थितीत उद्घाटन होणार आहे. दिग्दर्शन संग्राम भालकर यांनी केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सायंकाळी ५ वाजता बक्षीस वितरण होणार आहे.